# दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशन लि.मुंबई

भारतीय क्रिडा मंदिर, ४था मजला, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०० ०३१.
फोन: २४१३५७९७, २४१५११८५
● E-mail: admin@mucbf.com ● web: www.mucbf.com

जावक क्र:वार्षिक सर्वसाधारण सभा/ २०१७-१८ दिनांक: १४/०८/२०१७

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांकरिता)**

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स् फेडरेशनच्या सभासद नागरी सहकारी बँकांची व सभासद जिल्हा/विभागीय नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन्स्ची **३८ वी** वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक **१९ सप्टेंबर,२०१७** रोजी **दुपारी २:३०** वाजतां 'भारतीय क्रिडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१' येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया आपण सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

### सभेपुढील विषय

१. ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

२. दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

३. मा.अध्यक्ष यांनी सादर केलेला सन २०१६-१७ सालचा वार्षिक अहवाल, ३१ मार्च, २०१७ अखेरचे ताळेबंद व आय-व्यय पत्रक, तसेच सन २०१६-१७ सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहीत स्वीकृत करणे.

४. संचालक मंडळाने केलेल्या शिफारसीनुसार दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेरच्या वाढावा विभागणीस मंजुरी देणे.

५. सन २०१७-१८ सालाकरिता उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

६. संचालक मंडळाने केलेल्या शिफारसीनुसार फेडरेशनचे आर्थिक वर्ष २०१७-१८ सालाकरिता अंतर्गत लेखापरिक्षक आणि शासनाने मंजूर केलेल्या लेखापरिक्षकांच्या नामतालिकेतील वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.

७. महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा, १९६० अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या सहकारी संस्थांमधील अधिकारी आणि इतर कर्मचाऱ्यांच्या भरती/बढती प्रक्रिया फेडरेशनमार्फत राबविण्यासंदर्भात फेडरेशनच्या उपविधीमधील '**Objects**' मध्ये (xxii) चा समावेश करुन त्यानुषंगाने उपविधीत होणाऱ्या दुरुस्तीच्या प्रस्तावास मंजुरी देणे.

८. सन २०१६-१७ सालामध्ये उत्तम कामगिरी केलेल्या सभासद नागरी सहकारी बँकांना फेडरेशनच्यावतीने सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार वितरीत करणे.

९. मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक: १४/०८/२०१७
ठिकाण: वडाळा, मुंबई-४०००३१

**सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव

टिप:१) किमान गणसंख्येच्या अभावी सभा स्थगित झाल्यास, अशी स्थगित झालेली सभा अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी, त्याच ठिकाणी घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) सभेपूर्वी (दुपारी १:०० वाजता) भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे, त्याचा प्रतिनिधींनी अवश्य लाभ घ्यावा.